Functional Linkage for

**Collaborative Research and Student Exchange**

Between

**R. C. Patel Educational Trust's**
**R. C. Patel Arts, Commerce and Science College, Shirpur**

And

**Adivasi Satpuda Shikshan Prasarak Mandal's**
**Maharaj J. P. Valvi Arts, Commerce & Shri. V. K. Kulkarni Science College, Dhadgaon**

R. C. Patel Educational Trust's
R. C. Patel Arts, Commerce and Science College
Karvand Naka, Shirpur 425405, Dist - Dhule, Maharashtra
☎: (02563) 299328
E-mail: principal@rcpasc.ac.in

President
Hon. Bhupeshbhai Patel
Principal
Dr. D. R. Patil

Date: 20/08/2019

To,
The Principal,
Maharaj J. P. Valvi Arts, Commerce & Shri. V. K. Kulkarni
Science College, Dhadgaon

I am writing to highly recommend **Department of Economics, R. C. Patel Arts, Commerce and Science College, Shirpur** for the research collaboration opportunity with **Department of Economics, Maharaj J. P. Valvi Arts, Commerce & Shri. V. K. Kulkarni Science College, Dhadgaon**.

Many Researchers working in The Department of Economics have a profound understanding of economics, as evidenced by their multiple publications. Their innovative approach and ability to think critically have significantly contributed to our on-going research projects.

Please feel free to contact me if you require any further information. I am confident that Department of Economics will be an invaluable asset to your research collaboration.

Sincerely,

R. C. Patel Arts Commerce and Science College, Shirpur ★ R. C. Patel Educational Trust's

Dr. D. R. Patil
PRINCIPAL
R. C. Patel Educational Trust's
R. C. Patel Arts, Commerce and Science College
Shirpur, Dist.-Dhule (M.S.) 425405

R. C. Patel Educational Trust's
**R. C. Patel Arts, Commerce and Science College**
Karvand Naka, Shirpur 425405, Dist - Dhule, Maharashtra
☎: (02563) 299328
E-mail: principal@rcpasc.ac.in

President
Hon. Bhupeshbhai Patel
Principal
Dr. D. R. Patil

| | | |
|---|---|---|
| **Name of Institute/Industry** | :- | Adivasi Satpuda Shikshan Prasarak Mandal's Maharaj J. P. Valvi Arts, Commerce & Shri. V. K. Kulkarni Science College, Dhadgaon |
| **Year of Signing Linkage/ MoU** | :- | 2018 |
| **Duration of Linkage/MoU** | :- | 05 Years |

## List of Activities carried out under Linkage with Adivasi Satpuda Shikshan Prasarak Mandal's Maharaj J. P. Valvi Arts, Commerce & Shri. V. K. Kulkarni Science College, Dhadgaon

| Sr. No. | Particulars | Page No. |
|---|---|---|
| **1.** | Lecture in 'One Day Study Skill Workshop' | 04-05 |
| **2.** | Research Poster Presentation in District Level Avishkar-2023 | 06-08 |
| **3.** | Collaborative Research Publication | 09-11 |
| **4.** | Collaborative Research Publication | 12-13 |

**Authorized signatures:**

सरामहरु
PRINCIPAL
A.S.S.P.Mandal's
Maharaj J.P.Valvi Arts,Comm.,&
Shri.V.K.Kulkarni Science College
Dhadgaon Tal. Akrani Dist Nand

Adivasi Satpuda Shikshan Prasarak Mandal
Maharaj J.P.Valvi Arts & Science College Dhadgaon Tal.Akrani Dist.Nandurbar 425 414

RCPET's R. C. Patel Arts, Commerce and Science College • Shirpur •
SEAL

PRINCIPAL
R. C. Patel Educational Trust's
R. C. Patel Arts, Commerce and Science College
Shirpur, Dist.-Dhule (M.S.) 425405

The College is located at Tribal, Hilly & Arduous Area

NAAC ACCREDITED C++

...Adivasi Satpuda Shikshan Prasarak Mandal's...

# MAHARAJ J. P. VALVI ARTS, COMMERCE & SHRI. V. K. KULKARNI SCIENCE COLLEGE

DHADGAON, Tal. Akrani, (Dist. Nandurbar) ☎ : (02595) 220396, 220496

• College Code : 280061 • Centre Code : 2817 • E-mail ID : mjpvascdhadgaon@rediffmail.com

Outward No. 131 /2019 -2020 Date : 27 / 09/2019

## Attendance certificate

This is to Certify that Prof. Dr. A. G. Sonawane R. C. Patel Arts,Com & Science College, Shirpur,Tal- Shirpur, Dist-Dhule.Has worked as one day" **STUDY SKILL WORKSHOP** " Programme at dated 27/09/2019 held at A.S.S.P. Mandals, M.J.P.V.Arts,Com. & Science College Dhadgaon.

Director
Economics & commerce Mandal

PRINCIPAL
A.S.S.P.Mandal's
Maharaj J.P.Valvi Arts,Comm.,&
Shri.V.K.Kulkarni Science College
Dhadgaon Tal Akrani Dist Nandurbar

Date-: 27/09/2019



**Study Skill Workshop at Dhadgaon**

**Title of Poster Presentation**: - **पोस्टर स्पर्धा**

**Participant Name :-**(1) Prof. Raju Girdhar Pawar

(2) Prof. Dr. A. G. Sonawane

**Affiliation:-**

(1) Maharaj J.P Valvi Arts, Commerce, & Shri. V.K. Kulkarni Science College, Dhadgaon Tal Dhadgaon Dist Nandurbar Mob- 9423288696 Email. rgpawar25@gmail.Com

(2) R. C. Patel Arts, Sciences & Commerce College Shirpur Dist. Dhule Mob. 9423918036

Email - agsonawane1965@gmail.com

**Level of participation**:- Level - 3 - Post PG Students (PPG)

**Theme Name :- वनहक्क कायदा आणि आदिवासी जमातींचे सर्वांगीण उत्थान**

**Abstract :-** अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वन-हक्कांची मान्यता) अधिनियम 2006 आणि नियम 2008 नुसार वन हक्कांना मान्यता दिल्यावर जे अनुसूचित जमातींचे नागरिक पूर्वीपासून वनात राहत आहेत. त्यांच्यावर जो अन्याय झाला आहे. तो वनदावे मंजूर करून दूर करता येईल. तसेच आर्थिक बळकटीकरण जसे की रोजगार, अन्नधान्य, कुपोषण, भुकबळी या समस्यांचे निराकरण करून वनांचे संवर्धन, जैवविविधा, पर्यावरण रक्षण, वन्यप्राणी, यांची जोपासना, संवर्धन व संरक्षण करता येईल.

Prof Dr. A. G. Sonawane
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

प्रा राजू गिरधर पवार
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)



**Level of Participation**: - Level - 3 - Post PG Students (PPG)

(1) Maharaj J.P Valvi Arts, Commerce, & Shri. V.K. Kulkarni Science College Dhadgaon Tal Dhadgaon Dist Nandurbar Mob- 9423288696

(2) Prof Dr. A. G. Sonawane, R.C. Patel. Arts, Sciences & Commerce College Shirpur Dist. Dhule Mob 9423918036

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashatra University , Jalgaon

'A' Grade NAAC
Re-Accredited (4th Cycle)

**Research Festival**

**DISTRICT/REGIONAL LEVEL AVISHKAR - 2023 (Phase- I)**



| Participation Details: | |
|---|---|
| Registration ID: | AV-1348 |
| College Name: | A.S.S.P.MANDAL'S MAHARAJ J.P.VALVI ARTS, COMMERCE & SHRI.V.K.KULKARNI SCIENCE COLLEGE, DHADGAON. |
| Region/District of Participation: | Nandurbar District |
| Theme Area in which Participating: | Humanities, Languages, Fine Arts |
| Subject Name: | Social Sciences |
| Presentation Mode: | Poster Presentation |
| Participating Category: | M.Phil/Ph.D (PPG) |
| Group/Team Size: | 2 |
| Title of the Presentation: | वन हक्क कायदा आणि आदिवासी जमातीचे सर्वांगीण उत्थान |

| Mentor Details: | |
|---|---|
| Name: | Dr.A.G.Sonawane |
| Address: | KBCNMU Jalgaon |
| Email: | agsonawane1965@gmail.com |
| Mobile no: | 9423918036 |

| Research Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Awarded with Ph.D. : | No | Doing research under VCRMS Scheme : | No | | |
| Ph.D. registration at: | KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON | | | | |
| **Registration Fee Details:** | | | | | |
| Registration Fees (Rs.) : | 400 | | | | |
| **Facilities Required** | | | | | |
| Water Facility: | No | Table Facility: | Yes | Electricity Supply: | No |

**Participant Details:**

| Sr. No. | Name | Email | Phone/Mobile No. | Address |
|---|---|---|---|---|
| 1 | Prof.Raju Giridhar Pawar | rgpawar25@gmail.com | 9423288696 | Maharaj J.P.Valvi Arts,Comm.andSci.College Dhadagaon Dist.Nandurbar |
| 2 | Dr.A.G.Sonawane | agsonawane1965@gmail.com | 9423918036 | R.C.Patel ASC College Shirpur Dist.Dhule |

**Place:-**

**Date:-** **Signature of the Candidate(s)**

This is to certify that the above participant(s) is/are bonafide UG/PG student or Ph.D. Scholar/Teacher from KBCNMU doing Ph.D. in our School/College/Institute.

**Signature and Seal Principal/Head/Director**

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# वनहक्क कायद्यांची अंमलबजावणी - पर्यावरण संरक्षण आणि आदिवासी जमातींचा शाश्वत विकास

* प्रा. राजु गिरधर पवार

* प्रा. डॉ. अनिल गंभीरराव सोनवणे

* संशोधक, विद्यार्थी कबचौ उमवि, जळगांव, महाराज ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री वि. कृ कुलकर्णी विज्ञान महालविद्यालय, धडगाव ** ** मार्गदर्शक, आर सी पटेल कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिरपुर जि धुळे

**प्रस्तावना:**

आदिवासी जमातींचे वास्तव मुख्यत्वे करुन दऱ्याखोऱ्यात व पर्वतडोंरात आहे. आदिवासी समाज हा निसर्ग पुजक समाज असल्यामुळे निसर्गाशी म्हणजेच पर्यावरणांशी त्यांचे अतुट नाते आहे. सामाजिक रुढी परंपरा , चालीरिती , रितीरिवाज यातून आदिवासी संस्कृतींचे रक्षण करत असतांना निसर्गाशी घनिष्ट सबंध दर्शवतात. आदिवासी लोकांच्या गरजा मुळात कमी व मर्यादीत असल्यामुळे ते गरजेपुरता नैसर्गिक संसाधनांचा उपभोग घेतात. तृष्णा, हावरटपणा व लोभापासून ते दूर असल्यामुळे समाधानी व संतुष्ट जीवन जगतात.

बिगर आदिवासी समाजाचा आदिवासी दुर्गम भागात संबध आल्यापासून या गैरआदिवासी लोकांच्या भौतिक सुखसोयी, हावरटपणा , डामडौल व आत्मप्रौढी वृत्तीमुळे जंगलतोडीस सुरवात झाली.या वृक्षतोडीमुळे सर्वदूर डोंगरमाथा उघडा व बोडका झाला. याकारणांमुळे आदिवासी जमातींच्या राहणीमानावर व उदरनिर्वाहावर गंभीर परिणाम होवून त्यांचे सर्व प्रकारचे शोषण सुरु झाले. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाजांच्य२ उन्नतीसाठी अनेक उपाययोजना सुरु करण्यात आल्या. त्यापैकी अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन-हक्कांची मान्यता) अधिनियम 2006 आणि नियम 2008 नुसार वनहक्क कायदा लागू करण्यात आला आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**उद्देश:-**

1) पडित जमिनीचा योग्य वापर करणे

2) रोजगारभिमुख उपक्रम कार्यान्वित करणे

3) नैसर्गिक संसाधनांचा आर्थिक प्राप्तीसाठी उपयोग करणे

4) पडित व ओसाड जमिनीचा पर्यावरण रक्षणासाठी वापर करणे

5) वन संवर्धनातून जैवविविधतेचे रक्षण करणे

**गृहितके:-**

1) धडगाव तालुक्यात पडित व ओसाड जमिन उपलब्ध आहे

2) धडगाव भागात रोजगारांचा अभाव असून बेकार श्रमिकांची संख्या जास्त आहे

3) धडगाव भागात कुपोषण, दारिद्र, उपासमार, अनारोग्य दिसून येते,

4) अशिक्षित व निरक्षर लोकांची प्रमाण दिसून येतात



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

5) कष्टकरी, मजूर, श्रमिकांची लोकांचे प्रमाण जास्त आहे

6) सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या अधिक आहे

**स्पष्टीकरण :-**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव (अक्राणीमहल) परिसरातील सातपुड्याच्या डोंगर-दऱ्यात आदिवासी जमातींचे फार पुर्वीपासुन वास्तव आहे. हा समाज डोगर दऱ्या-खोऱ्यात राहत असल्यामुळे जंगलातील वनउपज, कंदमुळे, फळे, फळे, मध, डिंक, लाख, गवत, तेदुपत्ता, आयुर्वेदीक वनस्पती,जडीबुटी यांच्यासह शेती व पशुपालन करुन आपला उदरनिर्वाह करत असे. आदिवासी जनजातीची अर्थव्यवस्था जवळपास वस्तुविनिमयावर आधारित असल्यामुळे जवळपास बऱ्याच गरजा गावातल्या गावातपुर्ण केल्या जात होत्या. फारच थोड्या वस्तूसाठी त्यांना शहरात जावे लागत असे त्यामुळे विनियमासाठी पैशांची फारशी आवश्यकता वाटत नसे.

परंतु आदिवासी भागात गैरआदिवासी लोकांचा सबंध येत गेल्यामुळे या बिगर आदिवासी लोकांनी निरक्षर, अडाणी,लोकांच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेवून आदिवासीच्या शोषणांला सुरवात केली. यातून ह्या हावरट व लालची गैरआदिवासी लोकांची नजर सोन्याहून मौल्यवान इमारती लाकडावर गेली व तेथून जंगलतोडीस सुरवात झाली हळुहळू व पध्दतशीरपणे जंगलतोड सुरु राहिल्या मुळे धडगाव सह सातपुडा पर्वत पुर्णत: ओसाड व उजाड होवून जल जगंल जनीनीचा विध्वस्त झाला. जंगल उध्वस्त झाल्यामुळे जंगलावर ज्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होतो त्या जंगलवासींवर मोठ्या प्रमाणात अन्याय होवू लागला. जंगलच नाहीसे झाल्यामुळे व उदरनिर्वाहांचे साधनच नाहिसे झाल्यामुळे बेरोजगारी, कुपोषण, भुकबळी यासारख्या समस्या निर्माण झाल्या.

आदिवासी समाज पुर्वीपासून वनात राह आहेत त्यांच्यावर जो गैरआदिवास, शासकीय धोरण, सरदार सरोवर प्रकल्प, शासकीय कर्मचारी वर्ग इत्यादी मार्गाद्वारे जो अन्याय अत्याचार केला गेला. तो काही प्रमाण कमी करण्यासाठी वनदावे मंजूर करुन दूर करता येईल. तसेच पर्यावरण संरक्षण, संर्वधन व जोपासना, जैवविविधता, वन्यप्राण्यांचे संरक्षण व संवर्धन करता येईल. या सर्व बाबी विचारात घेवून अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन- हक्कांची मान्यता) अधिनियम 2006 आणि नियम 2008 नुसार वन हक्क कायद्यास मान्यता देण्यात आली.

व्यक्तीगत व सामुहीक वनजमिनी बाबतची शाश्वत विकासांची रचना खालील प्रमाणे:-

1) विविध प्रकारचे वृक्षलागवड

1.1) आवळा

1.2) बोर

1.3) सिताफळ

1.4) कोरपड

1.5) केतकीकंद

1.6) हिरडा)

1.7) कडीपत्ता

1.8) शेंवगा

1.9) चारोळी

1.10) आंबा

1.11) महू वगैरे

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

2) गौण वनोउपज

2.1) डिंक

2.2) लाख

2.3) तेदुपत्ता वगैरे

3) वन्य जीव व जैविक विविधताचे संरक्षण व संवर्धन

3.1) प्राणी

3.2) पक्षी

3.3) सरपडणारे प्राणी

3.4) जलचर प्राणी

3.5) लुप्त होणारे प्राणी व पक्षी यांचे संरक्षण व संवर्धन

**फायदे/गुण:-**

व्यक्तीगत व सामुहिक वनजमीन हक्क कायद्यान्वये वनदावे मंजूर झालेत तर खालील फायदे संभवतात

1) शाश्वत विकासांची विकासातून समृध्दी

2) रोजगार निर्मिती

3) उत्पन्नात वाढ

4) उत्पन्न वाढीतून राहणीमानचा दर्जा उंचावता येतो दारिद्र, कुपोषण भुकबळीला पायबंद बसतो

5) पर्यावरणासाठी पुरक

6) जैवविवधतेचे रक्षण

7) पशुपालन व पशुसंवर्धनास मदत

**उणिवा :-**

1) वन विभागाद्वारे मदत झाली पाहिजे

2) व्यक्तीगत दावे मंजूर झाल्यावर उत्पादन घेतले पाहिजे

3) सामुहीक वनदावे मंजूर झाल्यावर सामुहीक उत्पादन घेतले पाहिजे

4) विक्रीसाठी बाजार पेठाचा शोध घेतला पाहिजे

5) सहकारी संस्था स्थापन करुन उत्पादन विक्री प्रयत्न केले पाहिजे

6) विविध कार्यकारी आदिवासी सहकारी संस्था चा विक्री साठी उपयोग केला पाहिजे

**निष्कर्ष :-**

व्यक्तीगत व सामुहीक वनदावे मजुर केल्या नंतर जी पडीक जमीन व बेकार जाणाऱ्या श्रमाचा योग्य वापर करुन आदिवासी भागातील कुपोषण गरिबी, दारिद्र, भुकबळी इत्यादी समस्यांची सोडवणूक होण्यास मदत होईल व पशुपालन वाढून जैव विविधतेचे रक्षण करता येईल. शाश्वत विकास साध्य करत असतांना आदिवासी जमातींचा सर्वांगिंण उत्थान घडून येईल

**संदर्भ ग्रंथ :-**

1) देवगांवकर एस जी :-- आदिवासी विकास प्रशासन

2) पाटील रमाकांत :-- सातपुड्याचा कर्मयोगी

3) सामुहीक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन माहिती पुस्तिका

4) डोंगरे मा ग :-- वेध नक्षलवादी चळवळीचा

5) भामरे एन डी :-- अक्कलकुवा परिसरातील आदिवासी जमातींचा सांस्कृतिक इतिहास

*Cite This Article:*

Prof. Pawar R.G. & Prof. Dr. Sonavane A.G. (2023). **वनहक्क कायद्यांची अंमलबजावणी - पर्यावरण संरक्षण आणि आदिवासी जमातींचा शाश्वत विकास**. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 50–52). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10474582

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal**
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 257*
**ISSN : 2348-7143**
**January, 2021**

# महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळ आणि महामंडळच्या विविध योजनांचा अभ्यास

**प्रा. राजु गिरधर पवार**
(संशोधक)
महाराज ज. पो. वळवी कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय धडगाव जि. नंदुरबार

**प्रा. डॉ. अनिल गंभिरराव सोनवणे**
(मार्गदर्शक)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपुर जि. धुळे

**प्रस्तावना :**

आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन १९७२ मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचलनालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८३ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणाकरिता सन १९९२ मध्ये आदिवासी विकास संचलनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीन करण्यात आले.

आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे चार अपर आयुक्त व २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असून त्यांच्या मार्फत मागासवर्गीय कल्याणाच्या राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांतर्गत सामाजिक कल्याण, आर्थिक कल्याण, शिक्षणामध्ये प्रगती, सामाजिक न्याय, महिला व बाल विकास, आरोग्य, पोषण, रोजगार इ. बाबतच्या योजना राबविण्यात येतात. सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विकास विभागाकरिता रु. ५१७० कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे.

**राज्यातील आदिवासींची ओळख :**

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. गेल्या पाच दशकातील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२% |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९% |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७% |
| २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५% |
| २०११ | ११२३.७४ | १०५.१० | ९.३५% |

महाराष्ट्र राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती असून त्यात प्रामुख्याने भिल्ल, गोंड, महादेव काळी, पावरा, ठाकुर, वारली यांचा समावेश आहे. यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम, रायगड, ठाणे व पालघर जिल्ह्यातील कातकरी आणि गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड अशा तीन जमाती केंद्र शासनाने अदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या आहेत. राज्यातील एकूण ३६ जिल्हे असून त्यापैकी धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक, पालघर व ठाणे (सहयाद्री प्रदेश) तसेच चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. राज्यात एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असून त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये अतिसंवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहाणू, धारणी, किनवट, पांढकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

**महामंडळाची उद्दिष्टे :**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ हे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, अधिनियमान्वये १९७२ मध्ये स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत आदिवासी भागात कृषी माल व गौण वानोत्पादनाची खरेदी व विक्री करणे.
२) शासन, सार्वजनिक संस्था आणि महामंडळे यांच्या वतीने आदिवासी भागात एजन्सी तत्वावर विकास कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणे.
३) आदिवासी कुटुंबांना खावटी कर्जाचे वाटप करणे.
४) आर्थिक उत्पादनाच्या योजनांना कर्ज देणे.
५) आदिवासींच्या सर्वसामान्य विकासासाठी शासनाने सोपवलेले कोणतेही कार्यक्रम राबवणे.
६) आदिवासी क्षेत्रात रोजगाराचे कार्यक्रम विकसित करणे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास अर्थसहाय्य म्हणून रु.७५० लाख इतका नियतव्यय २०१३-१४ च्या आदिवासी उपयोजनेत निश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळातर्फे खावटी कर्ज योजना राबवली जाते. राज्यात खावटी कर्ज योजना १९७८ पासून आदिवासी क्षेत्रात सुरु करण्यात आली. ही योजना या महामंडळाकडून आदिवासी सहकारी संस्थांच्या सहाय्याने राबवण्यात येते. पावसाळ्यामुळे रोजगार नसलेल्या दिवसांमध्ये गरजू आदिवासी कुटुंबांना या योजनेअंतर्गत धान्य पुरवठा करण्यात येतो. या योजनेंतर्गत देण्यात येणारी मदत अल्प



170

मुदतीच्या कर्जाच्या स्वरुपात देण्यात येते. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे आहे.

**महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळच्या विविध योजना**

**अ. केंद्रीय–योजना**

**१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) याखाली सहाय्यक अनुदान केंद्रीय सहाय्य योजना :**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) याखाली सहाय्यक अनुदान आणि विशेष केंद्रीय सहाय्य योजना या दोन्ही योजना केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असून याकरीता १००% केंद्र सहाय्य उपलब्ध होते. या दोन्ही योजनांकरीता केंद्र शासनाने माहे जूलै, २०१६ मध्ये सुधारीत मार्गदर्शक सुचना जाहीर केल्या आहेत. सदर सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार पुढील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्याचे केंद्र शासनाने जाहीर केले आहे.

| अ.क्र | क्षेत्र | निधी उपलब्धता (%) |
|---|---|---|
| १ | शिक्षण | ४०–५०% |
| २ | आरोग्य | १०–१५% |
| ३ | कृषी, फलोत्पादन, पशुसंघटन, मत्स्य, दुग्धविकास | २०–३०% |
| ४ | रोजगार वनमीती योजना | १०–१५% |
| ५ | प्रशासकीय बाबी/ संशोधन | ५–१०% |

सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार रस्ते, विद्युतपुरिठा, पाणीपुरवठा योजना, मोठे जलससचन प्रकल्प, घरबांधणी यासारखे प्रस्ताव या योजनांतर्गत प्रस्तावित करता येणार नाहीत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) या योजनेअंतर्गत राज्यामध्ये चालविण्यात येणा–या १४ एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा (EMRS) तसेच नव्याने मंजूर करण्यात आलेल्या २ एकलव्य आश्रमशाळांकरीता निधी प्राप्त होत असतो. EMRS करीता प्रती विद्यार्थी प्रती वर्षाकरीता रु. ४२,०००/– इतके अनुदान प्राप्त होत असते. तर नवीन EMRS च्या बांधकामाकरीता रु. १२.०० कोटी प्रमाणे टप्प्या टप्प्याने अनुदान उपलब्ध करून दिले जाते.

**केंद्र शासनाकडून या योजनेकरीता प्राप्त निधी पुढीलप्रमाणे (प्रती वर्ष)**

| Sr. No | Scheme Name | Year | Grant Released from GOI |
|---|---|---|---|
| 1 | Special Central Assistance Scheme | 2013-14 | 7728.00 |
| | | 2014-15 | 11726.18 |
| | | 2015-16 | 12514.91 |
| | | 2016-17 | 9717.00 |
| 2 | Central Assistance under -Article 275 (1) of the Constitution of India | 2013-14 | 12489.00 |
| | | 2014-15 | 11701.30 |
| | | 2015-16 | 13374.00 |
| | | 2016-17 | 11680.73 |

**२. आदिम जमाती (PvTGs) संरक्षण तथा विकास कार्यक्रम**

केंद्र शासनाने राज्यातील कातकरी, कोलाम आणि माडीया रोंड या तीन जमातींना आदिम जमाती म्हणून घोषीत केले आहे.

| अ. क्र. | जमात | जिल्हे |
|---|---|---|
| १ | कातकरी | ठाणे, पालघर, रायगड, पुणे, व नाशिक |
| २ | कोलाम | यवतमाळ, नांदेड व चंद्रपूर |
| ३ | माडीया रोंड | गडचिरोली |

या जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी संरक्षण तथा विकास कार्यक्रमाखाली (CCD Plan) विविध व्यक्तीस तसेच समुह विकासाकरीता योजना राबविण्यात येत असतात. त्याअनुषंगाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करुन केंद्र शासनाने मान्यता प्रदान केलेल्या योजनांची अंमलबजाणी करण्यात येत असते. आदिम जमातींकरीता राज्य योजनेतून देखील निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो. सदर निधीचा वापर आवदम जमातींकरीता घरकुल बांधून देण्याकरीता वापरण्यात येत असतो. या योजनेची अंमलबजावणी घरकुल बांधकामासाठी ग्रामविकास विभागार्माफत तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येत असते. केंद्र शासनाकडून या योजनेकरीता काही वर्षाकरीता प्राप्त निधी पुढील प्रमाणे.

| Scheme Name | Year | Grant Released from GOI |
|---|---|---|
| Scheme for Development of Primitive Tribes | 2013-14 | 2610.00 |
| | 2014-15 | 1900.00 |
| | 2015-16 | 0.00 |
| | 2016-17 | 2017.00 |

**३. स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने**

केंद्र शासनाच्या Scheme of Grant in -id to voluntary organizations working for the welfare of Scheduled Tribe या योजनेखाली आदिवासी भागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, शेती उत्पादकता वाढविणे, सामाजिक सुरक्षा इत्यादी बाबी आदिवासी जनतेच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत असणा–या तसेच अनुसूचित क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांना १००% व या क्षेत्राबाहेरील संस्थांना ९०% अनुदान दिले जाते. केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १ एप्रिल, २००८ आदेशान्वये निकष निर्धारित केले आहेत. उपरोक्त क्षेत्रात कार्यरत असणा–या संस्थांचे प्रस्तावाच्या खरेपणा/ कमतरतेसंबधीत जिल्हाधिका–याच्या तपासणी अहवाल आयुक्त आदिवासी विकास यांना प्राप्त झाल्यानंतर आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या राज्यस्तरीय समितीच्या शिफारशीने केंद्र शासनास अनुदानासाठी पाठविण्यात येतात. सन २०१६–१७ करीता या आर्थिक वर्षापर्यंत शैक्षणिक, आरोग्य इत्यादी क्षेत्रात कार्यरत असलेल्या

ISSN : 2348-7143
January, 2021

एकूण २५ स्वंयसेवी संस्थाचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे अनुदानासाठी पाठविण्यात आलेले आहेत.

**आ. राज्य योजना**

| क्र. | योजनेचे नाव | योजनेचे विश्लेषण |
|---|---|---|
| १ | शासकीय आश्रमशाळा | १. शासकीय आश्रम शाळा समुह योजना उद्देश व स्वरुप |
| | | २. स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य |
| | | ३. आदर्श आश्रमशाळा |
| | | ४. एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा |
| २. | आर्थिक उत्पन्नाच्या योजना | १. आदिवासी शेतक-यांना विजपंप / तेलपंप पुरवठा करणे |
| | | २. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) |
| | | ३. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना (केंद्र पुरस्कृत योजना) |
| | | ४. आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना - केंद्रिय सहाय्य |
| ३. | इतर योजना | १. अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी |
| | | २. आदिवासी हस्तकला प्रदर्शन |
| | | ३. आदिवासी पारंपारिक नत्यस्पर्धा |
| | | ४. वारली चित्रकला स्पर्धा योजना |
| ४. | इतर विभागाकडुन राबविण्यात येणा-या योजना | १. तुषार ठिबक सिंचन योजना |
| | | २. शेळया मेढयांचा गट पुरवठा करणे |
| | | ३. अवरुद्ध पाण्यात मत्स्य संवर्धन करणे |
| | | ४. सहकार विभाग - वैयक्तिक लाभाच्या योजना व्याज अनुदान |

**निष्कर्ष :**

राज्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासह त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विभागाने १९७२ मध्ये स्वतंत्रपणे महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाची राज्यभरात ३५ उपप्रादेशिक कार्यालये, ९ प्रादेशिक कार्यालये आणि एक विभागीय कार्यालये अशी तब्बल ४५ कार्यालये आहेत. साडेसहाशे कोटींची वार्षिक उलाढाल आहे. विशेषत: १२ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये कार्यालयांची संख्या सर्वाधिक असून, आदिवासींनी पिकवलेला माल खरेदी करणे, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महामंडळावर आहे. नाशिक आयुक्तालयात या महामंडळाचे मुख्यालय ठेवून राज्यभर नियंत्रण ठेवले जाते. परंतु, या विभागात भ्रष्टाचाराचा शिरकाव झाल्याने या महामंडळालाही आता शबरी वित्त व विकास महामंडळाप्रमाणेच घरघर लागली आहे. सद्यस्थितीत महामंडळ कागदोपत्री नफ्यात दिसत असले तरी सर्व योजनांना टाळे लावण्यात आल्याने कारभार ठप्प झाला आहे. एकाधिकार गौणउपज खरेदी आणि एकाधिकार खरेदी या दोनच योजना सुरू असून, जवळपास ७ योजना भ्रष्टाचारामुळे बंद केल्या आहेत. आदिवासी विकासमंत्री अध्यक्ष, तर राज्यमंत्री हे महामंडळाचे उपाध्यक्ष असतात. महामंडळात ३४ संचालक असून, व्यवस्थापकीय संचालक हे सदस्य सचिव म्हणून काम करतात. परंतु, असे दिसुन येत आहे की या विभागाच्या अधिका-यांना अजिबात रस नसल्याने त्यांनी महामंडळाच्या कारभाराकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र टाईम्स या वृत्ता पत्रातील दि. ९ ऑगस्ट २०१८ चा आदिवासी विकास महामंडळ उरले फक्त कागदावर! लेख
2. https://tribal.maharashtra.gov.in/
३. वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०१८-१९ अहवाल
४. अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांचा २०१७-१८ चा अहवाल
5. https://www.vokal.in/question-marathi/131JK-
6. https://mr.vikaspedia.in/social-welfare